CNR No. MHRG040018582019

## नियमित दिवाणी दावा क्र.३४२/२०१२ निशाणी क्र.२६३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.७ ते ९ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्र.२६६ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादींनी सदरहू दावा एकत्र कुटूंबाच्या एकत्रीत मिळकतीच्या संदर्भात मिळणारे फायदे यात वादींचा निम्मा हिस्सा असल्याचे कथन करून त्या संदर्भात जाहीर ठराव करून निरंतर ताकीद आदेश मिळावा याकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ११ नुसार रेस जुडिकेटा या तत्वाची, तसेच स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट, १९६३ मधील कलम ४१ व त्या कायद्यामधील तरतुदींची बाधा आहे. वादींची हक्क प्रस्थापनेची मागणी प्राथमिक असल्याने वादींचा दावा कायद्याने चालु शकत नाही. सदरहू दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७ नियम ११ नुसार Barred by law असल्याने फेटाळण्यात यावा. दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २ नियम २ या तत्वाची बाधा असुन वादींच्या कथनानुसार दावा दाखल करण्यापुर्वी वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरूध्द नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ व त्यावरील दिवाणी अपील क्र.११२/१९९६ दाखल केले होते. वादींचा पुरावा झाल्यानंतर चौकशीअंती दोन्ही प्रकरणे फेटाळण्यात आली. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ फेटाळताना मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी दिले

असुन वादींना सदर दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. दाव्यातील कथन व दाखल कागदपत्रे विचारात घेता दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा आहे. वादींनी संदर्भित वाद मिळकतीबाबत हक्क सांगुन सन १९९५ मध्ये पहिले प्रकरण दाखल केले. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सन १९९४ मध्ये अथवा त्या सुमारास प्रथमत: वादींचा हक्क नाकारल्याचे दिसते. त्यामुळे वादींनी ३ वर्षांच्या मुदतीत दावा दाखल न केल्याने दावा मुदतबाहय आहे. वादींनी दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ यांच्या दरम्यान दिनांक ०६/०१/२००६ व ०९/०४/२००७ रोजी झालेले करार व विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मधील हुकूमनामा वादींवर बंधनकारक नाही असा ठराव करून ते दस्त रद्द करून मागितलेले आहेत. प्रतिवादी क्र.६ हे दिनांक ११/१२/२०१२ रोजी हजर झालेले असुन त्यांनी निशाणी क्र.६२ कडे दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश १ नियम १० नुसार अर्ज देऊन सदर करार व हुकूमनाम्याची माहिती व त्या संदर्भातील कागदपत्रे दाखल केलेली असुन वादींचा दावा दुरूस्तीचा अर्ज लिमिटेशनचा मुद्दा कायम ठेवुन मंजूर केला आहे. वादींनी या दाव्याच्या कामी विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मध्ये झालेला हुकूमनामा कायदेशीर नसल्याचे व तो हुकूमनामा वादींवर बंधनकारक नसल्याचे कथन केले आहे. विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मध्ये झालेला हुकूमनामा अयोग्य असल्याची कथने करून स्वतंत्र दावा दाखल करता येत नाही. सदर मागणीस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २३ नियम ३ व ३अ च्या तत्वाची बाधा आहे. वादींना दिनांक ११/१२/२०१२ पासुन सदर करार व हुकूमनामा यांची माहिती होती. वादींनी ३ वर्षांच्या मुदतीत सदर हुकूमनामा व करार आव्हानित केलेले नसुन दावा मुदतीच्या कायद्यान्वये Barred by law

असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७ नियम ११ मधील तरतुदींनुसार फेटाळण्यास पात्र आहे.

३. वादींनी निशाणी क्र.२६६ वरील त्यांच्या जबाबात कथन केले आहे की, रेस ज्युडीकेटा तत्वाचा मुद्दा हा कायद्यातील तरतुदी व वस्तुस्थिती यांचा संमिश्र मुद्दा असुन त्याबाबत दाव्यात पुरावा नोंदवुन गुणवत्तेवर निकाल होणे अनिवार्य आहे. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ व त्याविरूध्द दाखल झालेले दिवाणी अपील क्र.११२/१९९६ मध्ये झालेल्या निकालांमुळे वादींना दावा दाखल करण्याचा अधिकार आहे किंवा कसे ही बाब पुराव्याअंती निष्कर्षीत केली जाऊ शकते. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ चा निकाल हा विना कैफियत झालेला असुन त्या दाव्याचा निकाल हा गुणवत्तेवर झाल्याचे म्हणता येणार नाही. त्या दाव्याच्या कामी वादी, प्रतिवादींमध्ये तडजोड झालेली होती व तशी तडजोड पुरशीस त्या दाव्यात दाखल केली होती. त्या दाव्यात गुणवत्तेवर निकाल दिलेला नसुन त्या निकालाविरूध्द दाखल केलेल्या दिवाणी अपील क्र.११२/१९९६ या अपीलाच्या कामी सिडकोकडून १२.५% योजनेतुन भुखंड अपील चालु असताना वितरीत झालेला नसल्याने नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ चा दावा अपरिपक्व असल्याचा निष्कर्ष मा. जिल्हा न्यायालय यांनी काढून अपील फेटाळले होते, म्हणजे तो दावा व त्यावरील अपीलाचा निकाल गुणवत्तेवर झालेला नसल्याची बाब स्पष्ट आहे. रेस ज्युडीकेटाचे तत्व प्रस्तुत दाव्यास लागु होत नाही. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ दाव्याचे कारण व प्रस्तुत दाव्याचे कारण भिन्न असुन नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ च्या दाव्याचे कारण विचारात घेऊन प्रस्तुत दावा मुदतबाहय असल्याचे

कथन चुकीचे व बेकायदेशीर आहे. प्रस्तुत दावा दाखल करण्यास दिनांक १६/१२/१९९७ रोजी प्रत्यक्ष दावा भुखंडाचे वाटप झाल्याबाबत वादींना कळले तेव्हापासुन ३ वर्षांत दाखल केलेला असल्याने प्रस्तुत दावा मुदतीत आहे. निशाणी क्र.६२ कडील अर्जावर आदेश करतेवेळी मुदतीचा मुद्दा कायम ठेवुन अर्ज मंजूर केल्यामुळे प्रस्तुत दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होतेवेळी मुदतीच्या मुद्दयावर चौकशी होणार आहे. वादींना विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मधील तडजोड हुकूमनामा व त्या अनुषंगाने झालेले करार याबाबतची माहिती नव्हती. प्रतिवादी क्र.६ चा पक्षकार करण्याचा अर्ज मंजूर होत नाही, तोपर्यंत वादींनी त्याच्या संदर्भातील करार व हुकूमनाम्याबाबत दाद मागण्यासाठी वादींना कोणतेही कारण घडले असे म्हणता येणार नाही. मुदतीबाबतचा मुद्दा हा कायदा व वस्तुस्थिती यांचा संमिश्र मुद्दा असल्याने तो दिवाणी प्रक्रिया संहिता, क्रम ७, नियम ११ अन्वयेच्या अर्जाच्या चौकशीवेळी विचारात घेता येत नसुन दाव्याचा गुणवत्तेवर निकाल करतेवेळी विचारात घेता येईल. विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ या दाव्यास वादी व मयत वादी पक्षकार ९, तसेच वादी व मयत वादी हे त्या दाव्यातील कोणत्याही पक्षकारामार्फत त्यांचे हक्क सांगत नसल्याने दाव्यात झालेला तडजोड हुकूमनामा बेकायदेशीर असल्याने त्याबाबत वादी स्वतंत्र दाव्याने दाद मागु शकतात. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, क्रम २३, नियम ३ व ३अ च्या तरतुदी वादींना लागु होत नाहीत. प्रतिवादींचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

४. प्रतिवादी क्र.७ ते ९ यांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादींनी पुर्वी नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ व दिवाणी अपील क्र.११२/१९९६ दाखल केले असुन ते फेटाळण्यात आल्याने दाव्यास रेस

ज्युडीकेटाची बाधा असुन दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २, नियम २ व आदेश २३, नियम ३ व ३(अ) लागु होत असुन दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, दाव्यास स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे कलम ४१ ची बाधा असुन दावा फेटाळण्यात यावा. त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा निर्वाळा दिला.

**1) C. V. Rajendran & anr. Vs. N. M. Muhammed Kunhi, 2003(2) ALL MR 715(S.C.),** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Issue already raised and decided at earlier stage of suit and allowed to become final cannot be reagitated at subsequence stage of the same suit or proceedings."*

५. वादी यांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ गुणवत्तेवर निकाली झाला नसुन दोन्ही दावे निराळे असुन दाव्यास रेस ज्युडीकेटा दिवाणी प्रक्रिया संहिता, चे आदेश २, नियम २ व आदेश २३, नियम ३ व ३(अ) तसेच स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे कलम ४१ ची बाधा नसुन दावा मुदतीत दाखल केलेला असल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा. त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा निर्वाळा दिला.

**1) Prem Kishore and Others Vs. Brahm Prakash and Others, 2023 DGLS(SC)350,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Whether the eviction petition was dismissed for default which dismissal would certainly bar a fresh suit if instituted on the same cause of action. Words*

*certainly do not mean dismissal either on merits or on default.”*

2) **Soumitra Kumar Sen Vs. Shyamal Kumar Sen and Others, 2018 DGLS(SC) 460,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

*“Plaint has to be looked into for purpose of deciding application under Order VII, Rule 11, CPC ? Plaintiff may be guilty of suppression and concealment of facts? Such defence projected in the written statement cannot be looked into while deciding application under Order VII ,Rule 11, CPC.”*

3) **Pandurangan Vs. T. Jayarama Chettiar & Anr., Civil Appeal No.7743 of 2025,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

*“Issue relating to whether the exparty decree is obtained by collusion, or whether the defendant No.1, as alleged, has played fraud by filing a suit in a court having no jurisdiction or whether the appellant is a bonafide purchaser or not need to be examined in detail. Such circumstances require an in-depth examination or previous decree, and its impact on the second suit. Res judicata cannot be decided merely on assertions made in the*

*application seeking rejection of plaint.”*

4) **Adarsh Water Parks & Resorts Pvt. Ltd. Vs. Abdul Rashid Abdul Rehman Yusuf & Ors., 2021(5) ALL MR 172,** wherein, the Hon'ble Bombay High Court observed that,

> *“Consent decree challenge by third parties not permissible under proviso of Order 23 Rule 3. Compromise being not binding on third parties they would have to approach court in their own right and seek appropriate declaration in that behalf.”*

5) **M/s. Mongia Realty and Buildwell Pvt. Ltd. Vs. Manik Sethi, 2022 SAR Online (SC) 123,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *“Determination of the issue of limitation, in view of pleadings of the parties, is not a pure question of law. Therefore, same cannot be decided as preliminary issue under Order 14 Rule 2 of the CPC.”*

6) **Kamala and Ors. Vs. K. T. Eshwara Sa and others, 2008 DGLS(SC)621,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *“Rejection of plaint on ground that suit is barred by principles of res judicata such question involves a mixed question of law and facts ? Which requires*

*not only the examination of the plaint ? But also other evidences and orders passed in earlier suit ? Question can be decided by taking up the issue either as a preliminary issue or at the final disposal of the suit ? But not in an application for rejection of plaint under Order VII, 11(d)."*

7) **Fatehji and company and another Vs. L. M. Nagpal and others, (2015) 8 Supreme Court Cases 390,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

*"Suit for specific performance of agreement to sell immovable property. Applicability of limitation prescribed under Art. 54. Fact that plaintiffs were put in possession of property on the date of agreement. Relevance of Art.54 does not distinguish between a case where possession of property has been delivered in part-performance of agreement or otherwise."*

8) **Sau. Dipali Himmat Meherwal & Anr. Vs. Shaikh Nazir Mohammad Nasir & Ors. 2018(2) ALL MR 1,** wherein, the Hon'ble Bombay High Court, Aurangabad observed that,

*"Issue of limitation which is mixed issue of law and fact and issue of res-judicata are not to be considered at stage of application under Order 7 Rule 11. Further, suit involves disputed questions*

*which cannot be decided at time of considering application under Order 7 Rule 11. Plaint cannot be rejected on said grounds.”*

**9) Ganesh Keshav Patole Vs. Sheetal Sikandar Darne & Anr. 2018(6) ALL MR 660,** wherein, the Hon'ble Bombay High Court observed that,

*“Issue of res-judicata and limitation being mixed question of facts and law cannot be decided in application under Order 7 Rule 11(d). Whether suit is barred by limitation or not will have to be decided on basis of evidence led by parties after framing of issue as to limitation.”*

**10) M/s. Boshan Developers Pvt. Ltd. Vs. Communidade of Bordem through its Special Attorney & Ors.** wherein, the Hon'ble Bombay High Court, Panaji Bench observed that,

*“Suit involving knowledge and starting point of limitation. Disputed question of fact can be gone into only at trial. Plaint cannot be rejected as being barred by limitation.”*

**11) C. Natrajan Vs. Ashim Bai and Another, (2007) 14 Supreme Court Cases 183,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

*“Order 7 Rule 11(d) applies only if allegations made*

*in the plaint taken to be correct in their entirety appeared to be barred by any law and court is not entitled to consider the case of the defence. The question whether the suit is barred by limitation or not, would depend upon the facts and circumstances of each case."*

६. अभिलेखाचे अवलोकन करता, तसेच वादी व प्रतिवादी क्र.७ ते ९ यांचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा, वादी कृष्णा बाबू पाटील (मयत) कायदेशीर वारस मुक्ताबाई कृष्णा पाटील, जयराम कृष्णा पाटील (मयत) कायदेशीर वारस हिराबाई जयराम पाटील, मयुरेश जयराम पाटील, आयुश जयराम पाटील, पार्थ जयराम पाटील, राजाराम कृष्णा पाटील, दिलीप कृष्णा पाटील, अनिता कृष्णा पाटील, ताराबाई अनंता पाटील, सुनिल अनंता पाटील, रणधीर अनंता पाटील तर्फे ताराबाई अनंता पाटील यांनी ताराबाई काशिनाथ पावसे, काशिनाथ माधव पावसे (मयत) वारस ताराबाई काशिनाथ पावसे, केशव काशिनाथ पावसे, कैलास काशिनाथ पावसे, श्रीधर काशिनाथ पावसे, राकेश काशिनाथ पावसे, लताबाई मंगलदास माळी, कांताबाई बाळाराम पाटील, लक्ष्मी मोहन म्हात्रे, वंदना रघुनाथ मढवी, अप्सरा काशिनाथ पावसे, बाबीबाई लक्ष्मण मयेकर (मयत) वारस कृष्णा लक्ष्मण मयेकर, हिराबाई तुकाराम पाटील, मुख्य भूमी चिफ लॅन्ड सर्व्हे ऑफीसर, लॅन्ड विभाग, सिडको लि., मे. राजहोम्स पिरॅमिड ग्रुप, हली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील, सुभाष काळु उर्फ काळुराम म्हात्रे, बाळाराम काळु उर्फ काळुराम म्हात्रे, जिजाबाई काळुराम म्हात्रे, द्रौपदी वसंत पाटील, बळीराम आंबो लोखंडे यांचेविरूध्द दाखल केल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा दावा वादींनी दिनांक

१६/०१/१९९७ रोजीच्या वाटपपत्रान्वये प्रतिवादी क्र.५ यांनी १२.५% योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या दावा मिळकतीच्या मोबदल्यातील भुखंडात वादींचा अर्धा हिस्सा आहे हे जाहीर करण्याकरिता, तसेच विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मधील प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ यांच्यामधील तडजोड वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करण्याकरिता व दिनांक ०६/०१/२००६ व दिनांक ०९/०४/२००७ रोजीचे प्रतिवादी क्र.१ ते ४ व प्रतिवादी क्र.६ यांच्यातील विक्री करारनामे कायदेशीर व वैध नसुन वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करून मिळण्याकरिता व प्रतिवादी क्र.१ यांनी त्रयस्थ इसमांचे हक्क व हस्तांतरण करू नये, तसेच प्रतिवादी क्र.५ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या लाभात पंचलड येथील भुखंडाचे भाडेपट्टा करू नये असा मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. दिवाणी अपील क्र.२१६/२०१३ चा हुकूमनामा अभिलेखावर दाखल असुन सदरहू अपील ताराबाई काशिनाथ पावशे, केशव काशिनाथ पावशे, कैलास काशिनाथ पावशे, श्रीधर काशिनाथ पावशे, राकेश काशिनाथ पावशे यांनी मे. राजहोम्स पिरॅमिड ग्रुप, राज मोतीलाल कंधारे, संदीप सखाराम पाचपुते, मोहन गणपत दांगट व सिडको यांच्याविरूध्द केल्याचे दिसुन येते.

७. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ कृष्णा बाबू पाटील, ताराबाई अनंता पाटील, सुनिल अनंता पाटील, रणधीर अनंता पाटील यांनी ताराबाई काशिनाथ पावशे, काशिनाथ माधव पावशे, बबीबाई लक्ष्मण मयेकर, हिराबाई तुकाराम पाटील, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी सिडको मर्यादित यांचेविरूध्द दावा मिळकती संबंधातील १२.५% प्रमाणे निवासी भुखंडात वादींचा अर्धा मालकी हक्क व हिस्सा असुन अर्ध्या हिश्श्याची निवासी भुखंडाचे ॲलॉटमेंट व ताबेकब्जा मिळण्याचा वादींना कायदेशीर अधिकार

असल्याचे व दावा मिळकतीसंबंधातील भुसंपादन अधिनियम, कलम १८ व २८अ प्रमाणे दाखल केलेला रेफरन्स अर्जान्वये मिळणाऱ्या अपेक्षित नुकसानभरपाईच्या रकमेत वादींचा अर्धा हिस्सा असुन वादींना अर्ध्या हिश्श्याची नुकसानभरपाईची रक्कम मिळण्याचा कायदेशीर अधिकार असल्याच ठराव मिळण्याकरिता, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीबाबत १२.५% योजनेप्रमाणे निवासी भुखंडापैकी अर्ध्या हिश्श्याचे भुखंडाचे ॲलॉटमेंट व ताबेकब्जा प्रतिवादी क्र.५ यांचेकडून घेऊ नये, तसेच प्रतिवादी क्र.५ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दावा मिळकतीबाबत १२.५ टक्के योजनेप्रमाणे निवासी भुखंडापैकी अर्ध्या हिश्श्याच्या क्षेत्राचे भुखंडाचे ॲलॉटमेंट व ताबेकब्जा देऊ नये व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी निवासी भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा विक्री व्यवहार करू नये, त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करू नये, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी अपेक्षित वाढीव नुकसानभरपाईमधील अर्ध्या हिश्श्याची रक्कम विशेष भुसंपादन अधिकारी, पनवेल रायगड अगर मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचेकडून घेऊ नये असा निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केल्याचे दिसुन येते. दिवाणी अपील क्र.११२/१९९६ हे कृष्णा बाबू पाटील, ताराबाई अनंता पाटील, सुनिल अनंता पाटील, रणधीर अनंता पाटील यांनी ताराबाई काशिनाथ पावशे, काशिनाथ महादेव पावशे, बबीबाई लक्ष्मण मवेकर, हिराबाई तुकाराम पाटील यांच्याविरूध्द केल्याचे दिसुन येते. सदरहू अपीलाचे दिनांक ०६/०८/१९९७ रोजीचे न्यायनिर्णय अभिलेखावर दाखल असुन त्यावरून अपील खर्चासह फेटाळण्यात आल्याचे दिसुन येते. उपरोक्त न्यायनिर्णयातील बाबी या हातातील प्रकरणातील बाबींपेक्षा निराळ्या असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय हातातील प्रकरणास लागु होत नाही.

८. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ मधील दाव्याचे कारण व सदरहू दाव्याचे कारण वेगवेगळे असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. दोन्ही दाव्यातील पक्षकार दावा मिळकत व मुद्दे रेस ज्युडीकेटा लागु होण्याकरिता समान असणे आवश्यक आहे. सदरहू मुद्दा हा कायदा व वस्तुस्थिती यांचा संमिश्र प्रश्न असुन अभिलेखावर संपुर्ण पुरावा आल्याशिवाय निष्कर्ष काढता येणार नाही. प्रतिवादी क्र.७ ते ९ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादींनी पुर्वीचा दावा संपुर्ण हक्क मांडून दाखल न केल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २ नियम २ लागु होत असुन विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मधील तडजोड हुकूमनामा आव्हानीत करता येणार नाही. वादींचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादी विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मध्ये पक्षकार नसुन त्यांना तडजोडीबाबत नंतर माहिती मिळाली. दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २, नियम २ लागु होतो किंवा नाही हे दोन्ही दाव्यांच्या कारणांची तुलना करून सदरहू मुद्दयाबाबत अभिलेखावर संपुर्ण पुरावा आल्याशिवाय निष्कर्ष काढता येणार नाही. सदरहू मुद्दयावर दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही. वादींनी दाव्यात ठराव व मनाई हुकूमाची मागणी केली असुन त्याबाबत अभिलेखावर संपुर्ण पुरावा आल्यानंतर निष्कर्ष काढता येणार असुन या टप्प्यावर दाव्यास स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे कलम ४१ अन्वये दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही.

९. दाव्यास मुदतीची बाधा आहे किंवा नाही हा प्रश्न दाव्यातील तथ्ये व परिस्थितीवर अवलंबून आहे. दाव्यात दाव्यास कारण घडल्याबाबत व मुदतीसंदर्भात नमुद केलेले असून मुदतीचा प्रश्न हा कायदा व तथ्यांचा मिश्र प्रश्न असून दाव्यातील कथनानुसार प्रथमदर्शनी दाव्यास मुदतीची बाधा असल्याचे म्हणणे न्यायोचित होणार नाही. अभिलेखावर संपूर्ण पुरावा

आल्याशिवाय व दाव्यातील तोंडी आणि कागदोपत्री पुराव्यांचा विचार केल्याशिवाय याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. दाव्यास कायद्याची बाधा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नसुन अशा परिस्थितीत दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही, परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: आदेश ::**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.02.17 17:44:19 +0530

पनवेल
दिनांकः १६/०२/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
पनवेल